श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

अंक ९, वर्ष ८ ] कार्तिक [ शके १८५३

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


पुण्यतिथि कीर्तनाख्यान ... ... ... ... १-२८

श्री शिरडी संस्थानचा शके १८५२ सालचा जमाखर्चाचा आढावा


---

# विनंति.

सुप्रसिद्ध श्री.मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची " यशोदा पांडुरंगी " टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

---

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

—प्रकाशक.

श्रीदत्तचित्साइ सद्गुरुभ्योनमः

# पुण्यतिथि कीर्तनाख्यान

## नमन

श्रीगणेशायनमः। सजयति सिंदुरवदनो देवो यत्पाद पंकज स्मरणंम्। वासरमणिरिव तमसां राशिं नाशयति विघ्नानाम्।

### १ पद

( रामदास माउली० या चालीवर )

दयाघन माउली। माय माझी दत्तराज माउली॥
दत्तराज माउली गे। माय माझी ज्ञानराज माउली॥
ज्ञानराज माउली गे। माय माझी साइराज माउली॥
लपुनी जगतीं सूत्र ओढिते। हलवि चराचर बाहुली॥ माय माझी ॥१॥
भवभय तापें तप्त दास हा। करिं करुणेची साउली॥ माय माझी ॥२॥
काममदादिक गांजिति निशिदिनिं। दूर करिं अहितावली॥ माय माझी॥ ३॥
दीन बाळ तव, नमुनी विनवी। ठाव देई तव पाउलीं॥माय माझी॥४॥

### २ अभंग

( गौरीशंकर पुजिला ज्यांनीं० या चालीवर )

शरण साई चरणीं गेला। त्यानें भवबंध तोडिला। त्यानें॥ १॥
हाणि कालासी तो लाथा। काल ठेवी तत्पदिं माथा॥ काल॥ २॥
ऐसा संतांचा अधिकार। साइ संतांचें सरकार॥ साइ॥ ३॥
करुं सरकारा मूजरे। आपण चरणाचे हूजरे॥ आपण॥ ४॥
नलगे गुप्त मुक्ती ठेवा। अन्य भक्तांना तो द्यावा॥ अन्य॥ ५॥
बाळ प्रार्थी नित्य मेवा। देई तव पद भक्ती सेवा॥ देइ॥ ६॥

---

१ शत्रुपंक्ती=शत्रुसमुदाय. अहित= शत्रु,-अरि, रिपु. आवली-पंक्ती, समुदाय, मंडळ, वृन्द.

३ पद

( नाम तुझें बहुगोड० या चालीवर )

नाम तुझें विष[1]भोग । साई नाम तुझें विषभोग ।
रसना[2] नेघे, वदे, जहर कटु । म्हणुनी होत वियोग ॥ साई ॥ १ ॥
सज्जन वदती नाम मधुर परि । मज कां ये न सुयोग ॥ साई ॥२॥
वैद्य[3] विषाचें बनवि रसायण । तैंचि कळे उपयोग ॥ साई ॥ ३ ॥
नाम विषाचें मधुर रसायण । करुनि दावि विनियोग ॥ साई ॥४॥
धन्वंतरि तूं अखिल जगाचा । सत्वरिं टाळिं कुयोग ॥ साई ॥ ५ ॥
रसायणाचा एकचि वळसा[4] । देउनि पाहिं प्रयोग ॥ साई ॥ ६ ॥
कृपामृताच्या अनुपानासह । झडकरिं हरिं भवरोग ॥ साई ॥ ७ ॥

टाळी महाराज–साइनाथ गुरु माझे आई । मला ठाव द्यावा पायीं ॥

| | | | |
|---|---|---|---|
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |
| साइनाथ | ,, | मला ठाव | ,, |

श्री सच्चिदानंद सद्गुरु दत्त महाराज की जय.
श्री सच्चिदानंद सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज की जय.
श्री सच्चिदानंद सद्गुरु साइनाथ महाराज की जय.
श्री सच्चिदानंद सद्गुरु सर्व साधुसंत महाराज की जय.

---

१ विष घेण्यास जसें कठीण तसेंच तुझें नाम मुखीं घेण्यास कठीण. विषाचा भोग भोगण्यास जसें कठीण तसें तुझ्या नामाचा भोग भोगण्यासही कठीण. २ जिव्हा. ३ देवांचे वैद्य. ४ वेढा.

# पूर्वरंग—संतमहात्म्य

४ शार्दूलविक्रीडित

## पुनर्नमन

साक्षान्निर्गुण[1] वस्तु[3] सांडुनि जगत्काया विराटा[2] परा ॥
लीला[illegible] घेउनीं भुवि असे आली स्वरूपा वरा[4] ॥
जी वाडी[5], आलंकेव[6] शैल[7]धिमधीं ज्यां देखिली सुंदरा ॥
ती श्रीदत्तचिदीश साइजननी मी वंदितों सादरा ॥

## संतमहात्म्य

या अखिल ब्रह्मांडात साधुसंतांचा अधिकार फार मोठा आहे. प्रणवरूप ॐकार ज्यास एकाक्षर ब्रह्म म्हणतात, तें परमात्म्याचें प्रतीक आहे. ब्रह्मविष्णुमहेशादि उच्चतम देवता त्याच्या प्रतिनिधि होत. परंतु हे साधुसंत परमात्म्याचे प्रत्यक्ष सगुणावतार आहेत. कोणत्या वस्तूंत असलेली अदृश्य किंवा अगोचर शक्ति तिला कोणतें तरी एखादें मूर्त शरीर धारण केल्यावांचून कोणास दाखवितां येत नाहीं. सर्व सत्ता, सर्व सामर्थ्य, सर्व वैभव निर्गुण परमात्म्याचें आहे, ही गोष्ट खरी आहे. सर्व विश्वांतील तेजाचे मालक परमात्मा आहेत. ते तेजाची खाण आहेत, ते तेजाचे निधि आहेत, भांडार आहेत, हें सर्वश्रुतच आहे.

" यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।
यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥ "

श्री. भ. गी. अ. १५

याप्रमाणें श्रीकृष्ण परमात्म्यांनीं अर्जुनास सांगितलें आहे. तथापि सूर्यचंद्रादि देवतांचीं शरीरें निर्माण केल्यावांचून परमात्मतेज विश्वाला ज्ञात होत नाहीं. म्हणून परमात्मशक्ति ज्ञात होण्याकरितां निर्गुण

१ परमात्मा. २ श्रेष्ठ, विराट स्वरूप. ३ शरीर. ४ उत्तम. ५ नरसोबाची वाडी. ६ आळंदी. ७ शिरडी.

वस्तूस साधुसंतांचीं सगुण स्वरूपें किंवा शरीरें धारण करावीं लागतात. मग परमात्म्यास जें करितां येत नाहीं तें साधुसंत करतात. परमात्म्यास जें देतां येत नाहीं, तें साधुसंत देतात. संतांचें ऐश्वर्य अफाट, सामर्थ्य अचाट, पराक्रम प्रचंड, शक्ति अतुल व सत्ता अपार. ब्रह्मप्राप्तिमार्गदर्शक संत, मोक्षज्ञानदाते संत, सेवा करण्यास योग्य संत, चालते बोलते कल्पतरु संत, चालते बोलते चिंतामणी संत, चालत्या बोलत्या कामधेनु संत, चालते बोलते परीस संत, निर्गुण वस्तूचें सम्यक् ज्ञान करून देणारे संत होत.

## परमात्म सम्यक् ज्ञान

५ दिंडी

जरी सम्यक् परमात्म ज्ञान व्हावें । असे वांच्छा मनिं संतपद सेवावें ।।
दास्य सर्वस्वें तनु मनें तसें जीवें । सकल अभिमाना रहित तें करावें ।।

श्री. ज्ञा. अ. ४, श्लो. ३४, ओ. १६५- १६७.

सदैव आपले शरीरांत असून हरवलेल्या अथवा चुकामुक पडलेल्या परमात्म्यास शोधावयाचें असल्यास त्यांना संतांजवळ शोधावें.

## हरवलेल्या परमात्म्याचा शोध

६ आर्या

जरि हरपला निजात्मा संतापाशींच त्यासि गिवसावें ।।
वानावें यश गावें संतांचे गुण सदैव परिसावे ।। १ ।।

श्री. ज्ञा. अ. १८, श्लो. १६, ओ. ४००.

अशा परमोच्च योग्यतेचे जे संत त्यांना परमात्मा डोक्यावर घेऊन नाचतात, त्यांना आपले देव मानतात. त्यांना त्यांचें वेड लागतें. त्यांना पाहतांच परमात्म्यास समाधान वाटतें व संतोष होतो. परमात्मा त्यांचें ध्यान करितात. संतांशिवाय त्यांना दुसरें कांहींच चांगलें दिसत नाहीं. त्यांच्यावांचून ते इतरांना मान देत नाहींत. संत हे परमात्म्याचे लाडके व प्रिय आहेत.

संतुष्टः सततं योगी । यस्मान्नो द्विजते लोको । अनपेक्षः
शुचिर्दक्षः । योनहृष्यति न द्वेष्टि । समः शत्रौच मित्रेच ।
तुल्य निंदा स्तुति मौनी । येतु धर्म्यामृत मिदं ॥

श्री. भ. गी. अ. १२, श्लो. १४ ते २०

## परमात्माना संत फार प्रिय

७ पद

( प्रीति जी दुज्यावर मोठी० या चालीवर )

वंदु त्यांतनु मनुवाचें । नाचुं त्यां शिरीं धरु साचे ॥ कीरिटी॥ धृ०
साहुं टांचें हृदयीं त्यांची । मानु ती खूण विजयाची ॥ कीरिटी॥१॥
करुं आम्हि तयाचें ध्यान । ते आमुचें देवस्थान ॥ कीरिटी ॥ २ ॥
गोमटें न त्या सम आन । देऊं ना इतरां मान ॥ कीरिटी ॥ ३ ॥
नर वरा, रणधुरंधरा, अति प्रियकरा, व्यसन मज त्यांचें, व्यसन
मज त्यांचें । ते मिळतां तें शर्मन नयनांचें ॥ कीरिटी ॥ ४ ॥

श्री. भ. गी. अ. १२, श्लो. १७, १९, २०,

ओ. १३६, १८८, व २२१.

यावरून परमात्मापेक्षा संत श्रेष्ठ आहेत हें उघड व निर्विवाद आहे. जड जीवांना परमात्मापेक्षा निःसंशय सगुणावतार संतांचेंच श्रेष्ठत्व जास्त. निर्गुण अव्यक्ताची भक्ति फक्त एक ज्ञानी माणसासच साधते, पण ती अत्यंत क्लेशानें व कष्टानें. इतर आर्त, जिज्ञासु व अर्थार्थी भक्तांना ती साधतच नाहीं. अशा भक्तांना सगुण भक्तीच उपयोगी. स्वतःच्या बाहुबलानें अफाट व अमर्याद सरित्पती तरून जाण्याइतकी क्लेश मय निर्गुण भक्ति. सहकुटुंब सहपरिवारें नौकेंत बसून जलनिधि तरून जाण्या- इतकी सोपी सगुण भक्ती. निर्गुण परमात्मा प्रत्यक्ष कार्यकर्ते नाहींत. सगुणा-

---

१ संतांना, ज्ञानी भक्तांना. २ लाथ ( श्रीभृगुऋषिची ). ३ चिन्ह—श्रीवत्सलांछन ४ चांगलें. ५ दुसरे. ६ शांति, समाधान.

वतार संत प्रत्यक्ष कार्यकर्ते आहेत. अव्यक्त किंवा निर्गुण परमात्मा व व्यक्त किंवा सगुणावतार संत यांचें नातें किंवा यांचा संबंध, सर्व चराचर विश्वास निमिषार्धांत आपल्या प्रखरतम मयूखांनीं संतप्त करणारा, नित्य रसरसलेला विराट स्वरूपाचा तेजोगोल श्रीसूर्यनारायण व तदंश बरोबरीं नित्य पेटणाऱ्या प्रत्येक चुलीतील लघु आकाराचा सुटसुटित हातांत घेण्यासारखा किंवा खिशांत ठेवण्याजोगा श्रीअग्निनारायण, यांच्यासारखा आहे.

## जगास परमात्मापेक्षा संतांचाच उपयोग जास्त

८ आर्या

**करि संतप्त जगातें दिनमणि[1] आत्म प्रचंड दुष्किरणीं[2] ॥**
**परि पाकसिद्धिकार्यीं वन्हिजसा योग्य ना तसा तरणी ॥**

सारांश पाकसिद्धीच्या कामीं जसा प्रखर रश्मी सूर्यनारायण उपयोगी पडत नाहीं, पण त्याचींच किरणें सूर्यकांत मण्यावर पाडून त्यापासून उत्पन्न केलेला तदंश जो अग्नि तो उपयोगी पडतो; त्याप्रमाणें अव्यक्त, अगोचर, निर्गुण, मूक वृत्तीचे परमात्मा जडजीवांना तारून नेण्यास उपयोगी पडत नाहींत. पण त्यांचेच अंश सगुणावतार नित्य व्यक्त, नित्य गोचर, नित्य बोलके असे जे संत तेच जडजीवांना तारून नेण्यास उपयुक्त असतात. परमात्म्यांना तरी साधुसंत इतके प्रियतम कां ? व त्यांना परमात्म्यांनीं आपल्यापेक्षांही जास्त अधिकार कां देऊन ठेविले आहेत ? याचें कारण ज्या परमात्माचें नांव एक वेळमुखांत यावयास सहस्र जन्म घ्यावे लागतात तें नांव संतांचे जिव्हेवर निरंतर नाचत असतें.

## सहस्रजन्म

९ दिंडी

**वदे ज्ञानेश्वर माय संत सांचे[3] । असति निर्गुण ईशस्य सगुण सांचे[4] ॥**
**नाम घेण्या मुखिं एकवार त्यांचें । पडति फेरे कीं जन्म सहस्राचें ॥**

श्री. ज्ञा. अ. ९, श्लो. १४, ओं. २०६.

---

१ सूर्य. २ तापदायक दुष्ट किरणांनीं. ३ खरोखर. ४ ठसे.

## संताच्या जिव्हेवर देवाचें नांव नेहमी नाचत असतें.

१० साकी

पूज्य न कां तें दैवत होतिल साधुसंत देवाचे ॥
वाचेवरि देवाचें त्यांच्या नाम निरंतर नाचे ॥
ऐसे संत जगीं। दुर्मिळ तरि या दुरित युगीं ॥

वरील कारणामुळें परमात्मा हे संतांना विकले गेले आहेत. परमात्माला यांचें वेड लागलें आहे, व्यसन लागलें आहे, छंद लागला आहे, नाद लागला आहे. परमात्मा नक्की कोठें आहेत, हें पाहावयाचें असल्यास त्यांना वैकुंठांत, भानुबिंबांत, अथवा योग्यांच्या ध्यानसमाधींत शोधून उपयोगाचें नाहीं. ते तेथें मिळणारच नाहींत. तर सज्जन भक्त ज्या ठिकाणीं अहोरात्र परमात्मनामाचा गजर अथवा घोष करीत असतील त्या ठिकाणीं ते नक्की व बिनचुक सांपडावयाचे.

भगवान श्रीसमर्थ ज्ञानेश्वर महाराज लिहितात—

## नामघोषाचे ठिकाणीं परमात्मा सांपडतात.

११ शार्दूलविक्रीडित

वैकुंठीं नच मी असें, नच तसा, मी भानुबिंबीं दिसें ॥
मी योगेश्वर मानसींहि न तसा, ध्यानीं समाधीं वसें ॥
उत्कंठा दृढ ही, असेल जरि कीं, मी सांपडावा अशी ॥
जेथें सज्जन, नामघोष करिती, तेथें पहावें मशीं ॥

करितां देव, परमात्मा, निर्गुण वस्तूची प्राप्ती करून घेण्याची इच्छा असेल तर त्या संतांनाच शरण गेलें पाहिजे.

श्रीसमर्थ तुकाराम महाराज म्हणतात—

## परमात्मप्राप्ति संतांशिवाय नाहीं.

१२ अभंग

जरि व्हावा तूज देव। तरि हा सूलभ ऊपाव ॥
करि मस्तक ठेंगणा। लागें संतांच्या चरणा ॥

असो. आतां आपण परमात्म नामाचा थोडा गजर करूं.

टाळी महाराज —

दत्त चिदीश्वर साईराज । विरिंचि हरिहर श्रीगणराज ॥

( दाहा वेळ म्हणणें )

श्री सच्चिदानंद सद्गुरू दत्त महाराजकी जय.

,, ,, ज्ञानेश्वर महाराज ,,

,, ,, साईनाथ महाराज ,,

,, ,, सर्वसाधुसंत महाराज ,,

( श्रीसद्गुरुराज बाबांच्या समाधीस माळ घालणें व समाधीवर बुका उधळणें. हरिदासबुवांस बुका लावणें; इतरास लावणें. )

( बुका लावण्याच्या वेळीं म्हणावयाचें पद )

## स्तवनानें सद्गुरुची महति कशी वाढेल ?

१२ पद

( नाम तुझें बहु गोड रामा नाम तुझें बहु गोड० या चालीवर )

संत चक्रवर्ती । साई संत चक्रवर्ती ॥ धृ ॥
चढवुनि कुसुमें कल्पतरूवरि । कोण वाढवी कीर्ती ॥ १ ॥
शिजवुनि सुंदर सुधारसातें । कोण वाढवि ख्याती ॥ २ ॥
केवि सुगंधें चर्चुनि चंदन । वाढवि कोण द्युती ॥ ३ ॥
पाहुणचारें क्षीरोदधिची । वाढवि कोण स्फूर्ती ॥ ४ ॥
नेर्वा स्तवनें कोण वाढवी । सद्गुरुची महती ॥ ५ ॥

## पूर्वरंग समाप्त.

# उत्तररंग आख्यान

## प्रारंभ

### नमन

### वंदन

१४ शार्दूलविक्रीडित

ज्या आदी नच मध्य अंत परि जो, ब्रह्मांड-भांडोदरा ॥
व्यापूनी न दिसे, पयीं घृत जसें, इक्षूरसीं शर्करा ॥
ओढी मायिक विश्वसूत्र लपुनी विश्वासि जो आसरा ॥
साष्टांग प्रणती तया नटवरा, श्री साइ विश्वंभरा ॥

### बाबांचें नांव, जात, कुल

१५ पृथ्वी

न नाम कुल जाति त्या, जननि तात ना आसरा ॥
न दार भगिनी सुता तनय सासु ना सासरा ॥
परी अखिल होउनी, जगिं नटे, स्वयें, येकला ॥
कलानिधिस हीं न हीं विणनटेश्वरा, ये, कला ॥

### बाबा प्रथम दिसले तें गांव

१६ साकी

निजाम प्रांतीं धुपखेडग्रामधिं प्रसिद्ध पाटिल राहे ॥
चांगा नामें सधन सुदैवी, संत प्रेम मनिं वाहे ॥
जाती यवनांची ॥ भक्ती अल्लावर साची ॥

---

१ सुवास. २ कीर्ति. ३ ब्रह्मांडरूपी भांडें हेंच पोट. ४ चंद्र. ५ नटेश्वरावांचून. ६ कौशल्य, विद्या, चातुर्य.

## प्रथम बाबा दिसलें तें ठिकाण

१७ दिंडी

चुकलि होती घोडि त्या पाटलाची ।
फिरत होता शोधीत रानमाची ॥
फिरत फिरतां पातला एक मार्गी !
जेथ दिसला तरुतळीं बाल जोगी ॥

## बाबा चांग पाटलास हाक मारतात

१८ घनाक्षरी

आवो आवो भाई आवो । भाइ तमाखू चिलीम लेवो ॥
तुम बी पीओ हमकु पिलाओ । दवडत कायकु है ॥

## येत नाहीं म्हणून चांग पाटील सांगतो

१९ घनाक्षरी

चुकगइ बाबा घोडी मेरी । नहिं चहिये अब चिलीम तेरी ।
वख्त नहिं मुझे होत है देरी । मय नहिं आउंगा ॥

## घोडी कोठें आहे तें बाबा सांगतात

**२० पद** ( चाल ठुंबरीची—जलभरनजा जमुनाके घाट० या चालीवर )

सुनकर ले रे भाई प्यारी । सुनो सुनोजी बात हमारी ॥ ध्रु ॥
धुंडत कायकु सबही जंगल । घोडि चरत है इदरहि तेरी ॥ १ ॥
इस कुपणोंके पैलितरफ है । लेता कायकु तखलिप भारी ॥ २ ॥
आंख खोलके देखो भाई । कायकु करत है इतनी देरी ॥ ३ ॥ सु०

## पाटील बाबांचे जवळ आला

२१ शार्दूलविक्रीडित

घोडी देखुनि तेथ पाटिल मनीं अत्यंत आनंदला ॥
वाचा सत्य असेंचि जाणुनि मनीं त्या संनिधी पातला ॥

जोगी बाल फकीर बोलत तया, चीलीम आतां करी ॥
घेई, घालि तमाखु पी, प्रथम तूं, देई मला नंतरी ॥

## चिलीम तयार करून बसला, अग्नि नाहीं

२२ कामदा

करि तयार तो चिलिम सत्वरी । वन्हि ना मिळे परि वनांतरीं ॥
जवळि ना दिसे पेटि पाटला । चांग शेवटीं स्तब्ध बैसला ॥

## बाबांनीं चिमटा ठोकून अग्नि काढला

२३ मालिनी

बघुनि मग फकीरें स्तब्धता पाटलाची ॥
निज करिं चिमटा घे आपटी भूवरीची ॥
अनल[1] प्रकट झाला तत्क्षणीं त्याच मार्गीं ॥
अनल न निजसत्ता, दावि त्या तो विरागी ॥

## प्रत्यक्ष परमात्मा

२४ पृथ्वी

न जोगि न फकीर तो, परि खुदाच प्रत्यक्ष तो ॥
न किन्नर न यक्ष तो सगुण मूर्त रक्ताक्ष तो ॥
न गारुडि पिशाच्च तो सदय येशु साक्षाच्च तो ॥
सशक्ति[2] विरूपाक्ष[2] तो सगुण निर्गुणातीत तो ॥

## बाबांचें तेज: तत्वावर प्रभुत्व

पद

( उद्धवा शांतवन कर जा० या चालीवर )

सामर्थ्य देखुनी नयनीं, अत्युद्भुत, तेजावरती ॥
कुतुकेंदु[4] उदित[5] हृद्गगनीं[6], प्रेमाब्धिस आली भरती ॥धृ०॥
दाटला कंठ अति मोदें, वदनातुनि शब्द न निघती ॥ १ ॥
तनु कंपित[7] पुलकित[8] झाली, नेत्राश्रू टपटप गळती ॥ २ ॥

---

१ अग्नि. २ गौरीसह शंकर. ३ तेजतत्वावर. ४ कौतुक किंवा कुतूहलरूपी चंद्र. ५ उदय पावला. ६ हृदयरूपी आकाशांत. ७ कांप लागली. ८ रोमांच उठले.

चाल:--मग नमी, विनवि ओ साई । चलो मेरे घरकु गुरुभाई ॥
मय बंदा आप इलाई ॥ ३ ॥

चाल:— दर्शन देनेकू मालिक मैया आती । जब आपनी तखदिर खुलती
॥ ४ ॥ सामर्थ्य देखुनी ॥

२६ स्वागता

" एक दो दिन यहीं रहेताहूं । छोडनेकु न जगा चहताहूं ॥
आइंगे कल, अबी नहिं आते " । बाल जोगिकथि यापरि त्यातें ॥

## बाबा प्रथम शिरडीस आले

२७ मंदाक्रांता

तस्मिन्नेवा विरल-विपिने वासरांस्त्रीन्विनीय ॥
नीत्वा चांगालय मपि भगै मंडयामास मासान् ॥
तस्यानस्याथचपरिणये गोत्रजैस्तेन सार्धम् ॥
श्री साईश-स्त्रिभुवनगुरुः शैलधी-माजगाम ॥

२८ कटाव

## शिरडी प्रदेश वर्णन

क्षेत्र शैलधी जीर्ण जुनाट । भोंवते श्रीगोदेचे पाट । कृष्ण-
भूमि मृदु पीक अचाट । ज्वारी बाजरी गहूं हरबरा । इक्षु-
दंडें जणुं चुंबि अंबरा । बागबगीचे । फुलांफळांचे । कोठें
कोठें पानवेलिचे । पिंवळी धवळी गंधें शेवती । नेवाळीचे
घोंस लोंबती । गुलाब गुलछडि गेंदमोगरा । जाइ जुई
मंदार कण्हेरी । बकूल चंपक नाना रंगी । तुलसी दूर्वा
बिल्व सुरंगी । लिंबू केळीं संत्रि फांकडीं । खरबुज टरबुज
मिठी काकडी । जांब जांभळें । मधुर रसाळें । गोड रताळें ।
काशिफळें भुइमूग भोपळे । दुधे कोहळे । लाल गाजरें ।

---

१ काळी. २ मऊ. ३ ऊंस. ४ आकाशाला. ५ सुवासिक. ६ झेंडू. ६ पारिजातक.
७ चांपा. ८ एक प्रकारचें अति बारीक पण अति सुवासिक फूल. ९ उत्तम.

कांदा लसूण कंद साजिरे[1] । तीळ खुरासणि मोहरी करडई । तांबोटी अलकोल गवारी । भेंडी कोबी कारलि पडवळ । कृष्ण[2] श्रावण श्वेत[3] घेवडा । चंचन बटवा अंबट चुका । अंबाडी अळु चणा[4] सुका । मूला मेथी करडी घोळू । हिरवी मिरची । हिरवी चवळी । सुगंध कोथिंबिर ती कवळी । कोमल आंगीं बारिक वांगीं । यापरि वस्तू पिकती ऐसा । भूमिभाग जो निर्मित करतो । प्रेमें वंदावा साई सद्गुरु तो । संतविनायक तो । सद्गति दायक तो ॥ १ ॥

## गोदावरी वर्णन

२९ कामदा

गौतमी जलं शुद्ध निर्मलं । परम-पावनं शांत-शीतलम् ॥
बाह्य-मंतरं प्राणि-नामलं । नित्यनाशकृच्चाल्प चंचलम् ॥

## दुसरे ज्ञानेश्वर

३० आर्या

या पुण्य तीर्थ क्षेत्रीं षट्षष्ठी[5] दिव्य वत्सरा[6] पूर्वी ॥
अवतरले श्री साई दुसरे श्री ज्ञानदेव या ऊर्वी[7] ॥

## बाबांची १६ वर्षांची मूर्ती

३१ आर्या

कमनीय[8] कृष्णमूर्ती जैसी प्रकटे अयोनिजा[9] ऽष्ट[10] सर्भा[11] ॥
षोडश वर्षा प्रकटे तशि साई शांत मूर्ति विष्णुसर्भा[12] ॥

## कै. काकासाहेब लिहितात

३२ साकी

म्हणती कोणी शैलधि माजी बाबा प्रथमचि आले ॥
जें श्री खंडेराय मंदिरा भीतरिं[13] ते तैं शिरले ॥

---

१ सुंदर. २ काळा. ३ पांढरा. ४ सुक्या हरभऱ्याच्या पाल्याची भाजी ५ साहासष्ट. ६ वर्षांपूर्वी. ७ पृथ्वींत. ८ सुंदर. ९ मातापितरांवांचून. १० आठ ११ वर्षांची. १२ सारखी. १३ आंत

## साईबाबा हें नांव कसें आलें

३३ साकी

" आवो साईबाबा " ऐसें भक्त रत्न स्वर्वासी[१] ॥
मंदिरस्थित[२] म्हाळसा[३] पतिनीं संबोधि[४]यलेत्यासी ॥

## मशिदींत राहूं लागले

३४ साकी

नेउनि ग्रामा माजि जागले शिं[५]पी यांच्या गाठी ॥
दिलि घालुनि त्या मूर्तीची[६] जी छेदि जन्म[७]-क्षय गाठी[८] ॥
राहे तो जोगी । मशिदिमधि मग बालविरागी ॥

## कै. आण्णासाहेब लिहितात

३५ इंद्रवज्रा

श्री निंब वृक्षातलि बालमूर्ती । चैतन्य-बीजांकुर[९] धन्य कीर्ती ॥
कीं ती गमे सावयवा[१०] विरक्ती[११] । कीं मूर्त[१२] शांती परमात्म शक्ती ॥

३६ साकी

त्या स्थलिं संध्याकालिं आईनें चोपदार नानांचे ॥
देखुनि मूर्ती सर्वा आधीं केलें सार्थक नयनांचें ॥
भाग्याची थोरी । लज्जित अंतरिं सुरनारी ॥

३७ लावणी

( जाउ नको रे विषयारविंची० या चालीवर )

उडूनि गेली मग ती तेथुनि चैतन्य--कला[१३]--कामिनी ॥
मशीद भूमीमाजि स्थिरावे, जशि चंचल सौदामिनी[१४] ॥ ध्रु० ॥
राहे तेथें नेत्र कटाक्षें[१५] भक्त--चित्त तोषवी ॥
स्तनपानाविण क्षुधा पिलांची भागवि[१६] जशि कासवी[१७] ॥ १ ॥

१ स्वर्गवासी. २ मंदिरांत बसलेले भक्त. ३ सोनार जातीचे. ४ हांक मारली. ५ आपा जागले व काशिराम शिंपी. ६ बाबांची. ७ जन्म मृत्यु. ८ ग्रंथी. ९ ब्रह्मबीजास फुटलेला अंकुर. १० अवयवसहीत. ११ वैराग्य. १२ मूर्तीमंत. १३ ब्रह्मकलास्वामिनी. १४ वीज. १५ पाहणें. १६ भूक. १७ स्त्री-कासव.

चालः–आणि मागुनि खावया शिळि भाकर तूकडे । कि भाकर तूकडे ॥
तशि तेल तमाखू धुनिची ही लांकडें । कि धुनिची ही लांकडें ॥
निशि पेटवि पणतित घालुनि बहु कांकडे । कि बहु कांकडे ॥
चालः–चिलीम फुंकी दिसे निदेली जागृत रात्रं[1] दिनीं ॥ प्रकाश देउनी भक्ता ऽज्ञाना नाशी जैशी रवि रजनीं ॥ उठूनि गेली ॥ २ ॥

## मशीदींतील बाबांचा नित्यक्रम

३८ कटाव

मसीदमाई प्रचंड वाट । गर्जुनि गाठी गौतमी कांठ । भोंवता सद्भक्तांचा थाट । मध्यें आसन शुभ्र सपाट । मागें लोड तक्के दाट । त्यावरी बैसे टेकुनि पाठ । विलसे संतांचा सम्राट । वसन खंड शिरिं वेष्टि निजकरीं । कपाल कफनी कौपिन धारी । शांति विरक्ती निरिच्छ वृत्ती । हात जोडुनी उभ्या राहती । मोहमदादिक स्वप्निं न शिवती । भव भय वृत्ती कृतांत भीती । सुदूर पळती आधिव्याधी । त्या देहला कधीं न बाधी । लोक संग्रहासाठिं उपाधी । ब्रह्मानंदीं मग्न सदाजो । समाधान संतोष जलनिधी । सहज समाधी भोगि निरवधी । देहावरि तो येइ कधिमधी । आर्त जनांना कधी औषधी । वेडि वाकडी कोडि सांकडीं । नमुनी पुसतां शीघ्र उलगडी । मात मनीची कथी तातडी । बोली बोले नाना परिची । विनोद थट्टा करी मस्करी । हांसे कोपे रुसे वरिवरी क्षमानुकंपा वसे अंतरीं । गाळि शिवी दे मारी सटके । फेंकि विटांचे फुटके कुटके । लागति जणुं ते अमृत गुटके । फिरकूं ना दे कोणा जवळीं । थरथर कांपे भक्त मंडळी । चंड रश्मिसम तेज प्रकाशे । कृतांत भासे अथवा रुद्रचि । उग्र भयंकर स्थान सोडुनि । जाइ भराभर धावे परते

१ रात्र.

यापरि तांडव। करी क्षण भरी शांत होउनि। पुनरपि बैसे निजासनावरि। धारण करि मग रूप मनोहर। मनमोहन मुरलीधर श्रीधर। शामसुंदर देवकि नंदन। कंस निकंदन हांका मारी। कोमल वचनें पुसे परोपरि। अनंत अद्भुत लीला करुनी। डोळे दिपवी अखिल जगाचे। जनमन लावी सगुण भक्तिला। प्रेम उपजवी ज्ञान शीकवी। ऐसा सुंदर ईश सदाशिव। अमोघ वैभव ब्रम्हांडाच्या। रंगभूमिवरि लीला नाटक। नित्य दावि जो प्रेमें वंदावा॥

## बाबांचें ब्रम्हतेज

३९ स्रग्धरा वृत्तम्

दृष्ट्वा यत्ब्रम्ह तेजः शुचि मधु रुचिरं शीतलं चित्तहारि॥
पूर्णेंदुः क्षीण कांतिर्भवति किल तथा दर्पको नष्ट दर्पः॥
श्रुत्वा यत्प्रेमवीचीः प्रियजन विषये लज्जितो भाति सिंधुः॥
तत्श्री साईपदाब्जे मम नतिततयः कोटिशः संतु नित्यम्॥

## बाबांचे ठिकाणीं सर्व देवांचें एकीकरण

४० शिखरिणी

अयं साई स्थाणुः किमुत गजतुंडः शिवसुतः॥
रमाया आहोस्वि द्रमण इति विष्णुः किमपरः॥
पुनर्गीतां ख्यातुं विजय गुरुकृष्णः किमथवा॥
अयं साई ब्रम्हा भवतु किमु तस्मै मम नमः॥

## बाबांच्या संबंधानें इतर संतांचे उद्गार

४१ घनाक्षरी

केडगांविच्या महाराजांचे। दिव्य वचन मम श्रवणीं नाचे॥
"साइ मुखाक्षर सदैव साचे। पक्के मनिं समजा"॥

४२ घनाक्षरी

श्री गंगागिर[2] बोलति लोका । आनंद[3] नाथहि वदति विलोका ।
" हिरा लाधला अमोल पक्का । बहु भाग्यें तुमच्या ॥

## बाबांच्या लीला कोणी कोणी लिहिल्या

४४ आर्या

लीला कथानुभव जणुं भक्ति विरक्ती चिदैव हे मांडे[4] ॥
भक्तार्थ[5] रोपिले[6] श्रीसाईसच्चरित[7]मृत हे मांडे ॥

## बाबांचें भाग्य

४५ भुजंगप्रयात

अहो पुण्य राशी अहो भाग्यराशी । परब्रम्ह साक्षाच्चिदानंद राशी ॥
अहो तेज राशी अहो शांति राशी । जगत्पापराशी विनाशी निराशी ॥

४६ भुजंगप्रयात

अहो साइची ये न शक्रास शैली । जरी खर्चि तो स्वर्ग-पुण्याइ-थैली ॥
पराच्या मनीचें अहो गूढ ताडी । तृतीया मुखांतूनि बाहेर पाडी ॥

## बाबांचें वचनामृत

४७ दिंडी

साइ वचनामृत नित्य मधुर साचें । त्यांत मिश्रण नच असत कटु रसाचें ॥
ज्ञान होत न हें स्वर्गिच्याऽमरांना[9] । कसें होईल तें मर्त्य[10] पामरांना ॥

## बाबांची महती कोण वर्णन करूं शकणार

४८ भुजंगप्रयात

कुठे सूक्ष्मजंतू[11] कुठे तो गरुत्मान्[12] । कुठे वारिजातीं[13] कुठे तो सरित्स्वान्[14] ॥
कुठे दीपिकाती[15] कुठे तो प्रभास्वान्[16] । कुठे मङ्कशामा कुठे तो मरुत्वान्[17] ॥

---

श्रीसमर्थ राजयोगी नारायण महाराज. २ एक शिरडीस त्यावेळीं असलेले संत. ३ श्रीसमर्थ सद्गुरु अक्कलकोट स्वामींचे शिष्य. ४ रोपें. ५ भक्त कल्याणार्थ. ६ लाविले. ७ जमीनींत. ८ कै. आण्णासा. दाभोळकरांनीं. ९ देवांना. १० मानवांना. ११ चिलीट. १२ गरुड. १३ डबकें. १४ समुद्र. १५ दिवटी. १६ सूर्य. १७ इंद्र.

४९ वसंततिलका

लीला चमत्कृति अनंत हि संतराया[१] ।
केल्या भवाब्धि जड जंतुसि संतराया[२] ।
त्या वर्णितां श्रमित गीर्थ[३] अपूर्ण काला[४] ।
श्रीशारदा[५] ! मग किती मति बालकाला ।

## महाराजांचें अवतार कृत्य

५० कटाव

यापरि शैलधि भूवरि गाजे । मानसि अमरावति ही लाजे । येति दर्शना दुरचे राजे । शास्त्री पंडित गुणगणमंडित । कीर्ति अखंडित भवभय पीडित । तपी योगिजन तडी तापडी । पतित बापडी तसेच परकी । विद्याकोविद परकी भाषा-शास्त्र विशारद सभाप्रवचनपटु । व्याख्यन धुरंधर । लेखन-शैली मोहक सुंदर । अधिकारी वा पण्याजीवा[६] । सुख वस्तूजन, अगणित नानाविध पदवीधर। कोणि सेश्वर कोणी निरीश्वर। मानिति कोणी वेद माउली। कोणी न घेती तिची साउली । निर्गुण भक्ती श्रेष्ठ मानिती । सगुण भक्तिची निंदा करिती । नानापरिचे समाज काढिति । नास्तिक बनती पाखंड बोलती । आपुला देश आपुली संस्कृति । आपुले वेद आपुली पद्धति । आपुले पूर्वज आपुली रीती । आपुली भाषा आपुली मती। आपुली स्थिती आपुली स्फिती । आपुले बांधव आपुल्या युवती । आपुले ग्रंथ आपुले संत । आपुले देव आपुले पंथ । आपुले वाङ्मय आपुले ज्ञान । आपुले अर्थ[७] आपुले तीर्थ । यापरि आपुलें जितुकें तितुकें । मानिति लटिकें टवाळि करिती । धर्म बुडविती : परक्या ज्ञानें नेत्र दीपती । साइ सद्गुरु संत भूपती । या सर्वांचें चित्त वेधिती । सगुण भक्तिचें महत्त्व कथिती । अनुभव देउनि तत्व पटविती । सांडुनि अळसा फेडुनि शंका । कर्त-व्याची करित जाग्रती । नास्तिकवृत्ती देशिं धाडिती । नयनीं ज्ञानांजन घालुनिया । अज्ञानाचा नाश करुनिया । अखिल

१ संतराज. २ उत्तम रीतीनं तरून जाण्यास. ३ वाणी. ४ अपुरा वेळ जिला ती ५ वाग्स्वामी ६ व्यापारी ७ पुरुषार्थ.

जनांनीं एकी करुनी। एक विचारें नित्य वर्तुनी। स्वहित साधण्या दिशा दाविती। बुद्धि खेंचिती सगुण भक्तिचे। दास बनविती। परमात्मीं दृढ भाव धरुनियां। कार्य कराया प्रवृत्त करिती। यापरि थोर मान्य विभूती। संत नृपाचे दास बनूनी। शैलधिमाजी निवास करिती। दर्शन घेती प्रभुचरणाचें। सार्थक करिती निज जन्माचें। साचें नाचें वाचे वरती। नाम जयाचें नित्य अखंड। घोष प्रचंड प्रेम उदंड। ज्यावरि यापरि सद्भक्तांचें। त्रिभुवन नायक जो। प्रेमें वंदावा ॥

## बाबांचें ऐश्वर्य

५१ कटाव

इंद्रादिक ते सुरगण सारे। संतनृपाची परिसुनि ख्याती। दिव्य विभूती पाहुनि नयनीं। वंदिति घालुनि मान खालती। पदीं लागती हात जोडिती। ध्याती स्तविती पूर्ण ब्रह्म तूं। पुण्यपुरातन नित्य निरंजन। सर्वसाक्षि सर्वज्ञ सनातन। ब्रम्हांडाचा मायबाप तूं। विश्वव्यापक जगपालक तूं। करिशी विश्वचा संहार। अमुचें वैभव सर्व असार। अमरावति ही तुच्छ भिकार। धन्य धन्य हे क्षेत्र शीरडी। मुक्ति रोकडी। धन्य धन्य हे शिरडि निवासी। संतदर्शन नित्य जयासी। धन्य मंदिर धन्य कूप। नीर अमूप, सुधे परिस तें फारचि गोड। केवळ ब्रह्मरसाची जोड। मशीद माइत धुनी नित्य। वैश्वानर तो ब्रह्म सत्य। नंदनवन ते वाटे तुच्छ। प्रधान[1] अथवा लेंडि बाग ही। वाटे केवळ सुरतरु गुच्छ। शाम सुंदर संत तुरंग। ऐरावत जणुं कीटक भृंग। भिक्षा भाकर मधूर सुरस। सुधा तिजपुढें फिकी निरस। निंब वृक्ष तो गुणें आगळा। हरिचंदन त्या पुढें नेभळा। वैराग्याचें तेज आगळें। कंदर्पाचा दर्प मावळे। बघुनी तंव तें रूप सांवळें। ऊर्वशि रंभादीक अप्सरा। लज्जित कंपित मनीं थरथरा। योगेश्वर तूं

१ रा. ब. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनीं महाराजाकरितां विकत घेऊन दिलेल्या जमिनीत ही बाग आहे. हिलाच लेंडिबाग म्हणतात.

कुंजविहरी । राधावल्लभ कृष्ण मुरारी । जानकिजीवन दशवदनारी । गौरीशंकर तूं मदनारी । कमला नायक तूं असुरारी । अखिल विश्व हा तुझा पसारा । कालासी तव भीम दरारा । त्रिगुण षड्रिपु सर्व विकार । कायिक मायिक त्वदीय पाइक । जन्म मृत्यु जगिं दिसती ताजे । त्यावरि सत्ता तुझीच गाजे । चंद्रार्कानल नित्य प्रकाशति । त्वदीय तेजें । सिद्धचि मुळचा परमात्मा तूं । मूर्तामूर्त व्यक्ताव्यक्त । दृश्या दृश्य सर्वेहि व्यापक । असुनि अभेद । तव चरणाच्या रजः कणाची । सरी न आम्हां ऐसी ख्याती । वानिति गाती ज्या संताची, मोदें वंदवा ॥

### ५२ लावणी

( झाउ नकोरे विषयारविचीo या चालीवर )

पाटिल निष्ठावंत शिरडिचे रामचंद्र नामा । थोर व्याधिनें खिळिले
शय्ये मिळे न आरामा ॥ धृ ॥
एक दिनीं त्या जीव नको परि मरण बरें वाटे । त्याच निशीं श्री
साइ मूर्ती सन्निध त्या प्रकटे ॥ १ ॥
पाय धरुनि तो विनवि भक्तवर " एक असे विनती " ॥
कथि सत्वर गुरु माय दयाळे " मदिया मरण मिती " ॥ २ ॥
चाल:—तव हुंडि परतली व्यर्थ न चिंता करी । कि चिंता करी ॥
परि जाईल तात्यां दसऱ्यादिनीं दो संवत्सरीं । कि संवत्सरीं ॥
कथि अप्रिय गोष्ट ना तया ठेवि अंतरीं । कि ठेवि अंतरी ॥
चाल:—उठले पाटिल, पडले तात्या मात घडली वामा ।
ताहिनि तात्या उठले गेले । बाबा स्वयेंचि निजधामा ॥ ३ ॥

---

१ रामचंद्र पाटील कोते. २ दिवस. ३ मरेल. ४ तात्या पाटील कोते. ५ रामचंद्र पाटील बरे झाले. ६ तात्या अजारी पडले. ७ विपरीत. ८ त्या ( दसऱ्याच्या ) तिसरीं ९ बरे झाले. १० समाधिस्थ झाले. ११ स्वतःच. १२ वैकुंठवासी.

पाटिल निष्ठावंत शिरडिचे रामचंद्र नामा ॥
थोर व्याधिनें खिळिले शय्ये मिळे न आरामा ॥ ध्रु ॥

५३ ओवी

यवन शक तेराशें सदतीस । तारीख नऊ मोहरम मास ॥
तारीख पंधरा अक्टोबर खास । सन एकोणिसशें आठरा ॥

५४ ओवी

अठराशें चाळीस शकाब्दवर । कालयुक्त नाम संवत्सर ॥
दक्षिणायन अश्विन मास थोर । वासर विजया दशमीचा ॥

५५ ओवी

धनिष्ठा नक्षत्र चंद्रमकरास । शूल[1], विष्टि[2], मंगळवार दिवस ॥
घटि अठरा पळें अट्ठेचाळीस । दशमी खलास ते काळीं ॥

५६ ओवी

अपराण्ह व्यापिनी एकादशीस । दिवसा तिहींचे समयास ॥
मशीदींत साई जगन्निवास । शिरडीस अवतार संपविती ॥

५७ ओवी

अंबा जैसी अपत्यासी । सांडुनि जाय स्वलोकासी ॥
साइ माय विरहार्णवि आपणासी । लोटुनि गेली निजधामा ॥

५८ पद ( रुचती कां तीर्थयात्रा० या चालीवर )

जाण्या कां उचित वाटे निजधामा अंबिके ।
विरहानलिं लेकरांना लोटुनि गे चंद्रिके[3] ॥ ध्रु० ॥
वडवानल क्रोधरूपा भडकुनि गे चंडिके ।
करुणाब्धी आटला कां ह्रदयें गे नंदके[4] ॥ जाण्या कां ॥

५९ मंदाक्रांता

गेलें गेलें अजि शिरडीचें तेज ऐश्वर्य गेलें ॥
नेलें नेलें मधुनि अमुच्या संत रत्नासि नेलें ॥

---

१ शळयोग. २ विष्टिकरण. ३ शीतळ प्रकाश देणारे. ४ आनंद देणारे.

केलें केलें हतविधिकरें[1] घोर दुष्पाप केलें ॥
झालें झालें खचित अमुचें नष्ट सौभाग्य झालें ॥

६० मंदाक्रांता

हा हा ! अंबे, त्वमसि अमुची ज्ञानशाला[2] विशा[3]ला ॥
बाला आम्हां त्यजुनि, त्यजिसी पुण्य-काया-दुशाला[4] ॥
आम्हा बालांवरी जननि तूं कोपलीसेच वाटे ॥
फाटे, माते, हृदय अमुचें नावरे शोक दाटे ॥

६१ पद ( कवणें तुज गांजियलें० या चालीवर )

हाय हाय ! संतराय जाय हरपुनि । शोकानल खाय काय जाय करपुनी ॥ ध्रु० ॥
धाय धाय रडति सर्व गाय होउनी । दुःख घाय रुपति हाय, हृदयिं टोंचुनी ॥
काय साइ माय आम्हां गेली सांडुनी ॥ हाय हाय ॥ १ ॥
वक्ष भाल पिटिति पुरुष बायका मुलें । दीन लीन म्लान वदन कंठ ना खुले ॥
गेलें जणुं देहांतुनि तेज झिरपुनी ॥ हाय हाय ॥ २ ॥
ज्ञान भास्करास्त ! नभा कालिमा आली । शिरडि नगरि सर्व शून्य भासुं लागली ॥
दिसती दिशा दश उदास तेज लपवुनी ॥ हाय हाय ॥ ३ ॥
वृक्षपर्ण[5] अप्प्रवाह कांहिं ना हले ॥ श्वापद कृमि विहग कुलें होत व्याकुलें ॥
बालकां न स्तन्य[6] देति बसती मुरडुनी ॥ हाय हाय ॥ ४ ॥
तुजविण गे क्षण न सुचे दिवस यामिनी[7] । साइ जननि करुण खनीं[8] येइ धाउनी ॥
येशिन जरि प्राण जात हृद्दि दारुनी ॥ हाय हाय ॥ ५ ॥

१ हातानें. २ परमार्थज्ञान देणारी शाळा. ३ मोठी. ४ मौल्यवान वस्त्र.

६२ अभंग

ज्यासि जाला नाहीं जन्म । त्यासि कैचें निजधाम ॥
संत नवा देह घेती । त्यांसि गेले गेले म्हणती ॥
जन्म क्षयातीत संत । सदा सर्वदा जीवंत ॥
त्यांचें अजत्वें जन्मणें । तैसें अनंतत्वें मरणें ॥
त्यांचें दिव्य जन्म कर्म । ज्ञानी जाणती हें वर्म ॥
ऐसा संतांचा अधिकार । कैसे जाणती पामर ॥
वर्मज्ञ ते मुक्त होती । कृष्ण परमात्मा बोलती ॥
बाळ विनवी सद्गुरु साई । देई दर्शन माझे आई ॥

श्री. ज्ञा. अ. श्लो ओ.

६३ ओवी

ज्ञानियांचें जें शरीर । तें मिथ्यात्वें निर्विकार ॥
जेथें पडे तेंचि सार । पुण्य भूमी ॥

दासबोध.

६४ कटाव

भव्य मंदिरीं दिव्य परिवरी । संगम रवरीं प्राकारान्वित । समाधि साजे रुचिर गोजिरी । निद्रित साईमाय अंतरीं । प्रतिदिनिं प्रभात समयीं छान । डिंडिम वादन, सनई गान । कूपतोय, मंगल स्नान । भरजरि चीनांबर परिधान, पवित्र । लेंडी उद्यानांतील सुभग फुलांचे । गुच्छ सुवासिक नाना परिचे हार मनोहर । शेरे सुंदर पीत हरित दूर्वांकुर कोमल । तुलसी बेल सुगंध शीतळ । साईजननी समाधिवरती । भक्त वाहती । धूप दीप नैवेद्य चतुर्विध । पक्व स्वादु मधुर फलावलि । तांबूल दक्षिणा । आरति करुनी । दीर्घ स्वरानें मंत्रोच्चारें । पुष्पांजलि त्या समाधिवरती । वाहति प्रेमें । करिति प्रदक्षिणा प्रसाद वाटिति । ध्याती स्तविती । प्रणवरूपिणी विश्व मोहिनी । अर्धनारि नटेश्वरादि । नाना परिचे वेष धरित जो, प्रेमें वंदावा ॥

६५ आर्या

संत-शवा[1] म्हणती ना शव, ते शिव[2] देह तो रमेश[3] असे ॥
जेथें शव ती भूमी, पुण्यसमाधी स्मशान ना, विलसे[4] ॥

६६ स्रग्धरा

येती दिंड्या, पताका, किती तरि न मिति टाळ आणि मृदंगा ॥
प्रेमें गाती अभंगां, अळविती विमला, सांडुनी दर्प-संगा ॥
स्वप्नीं चित्तीं शिवेना, शवभय भजनीं घालिती नित्य पिंगा[6] ॥
संतां गा[7], तत्समाधीर्थ, समजुनि नमिती, जोडिती मोक्षगंगा॥

६७ मंदाक्रांता

"बावा बावा" निशिदिनिं मना, बोल रे बोल बावा[8] ॥
"बावा" नामीं, कितितरि असे, दिव्य जादू अबावा[9] ॥
बा, बालिश्य त्यज, शरण जा, त्या न भूपा, नबाबा ॥
बा, बाधाना[11], तुज यमगृहीं[12], जावयाची जबाबा ॥

६८ मंदाक्रांता

मा मा तिष्ठ क्षणमपि मनो जीव-कुग्राम-देशे ॥
सौख्यागारं "शिव" इतिपुरं दूरपारे भवाब्धेः॥
अत्युत्कंठा प्रबल तरणी तत्र चेत्तेऽस्ति गंतुम्
त्वत्सान्निध्ये, वसति कुशलः साई सत्कर्णधारः ॥

६९ अभंग

शरण साई चरणीं गेला । त्यानें भवबंध तोडीला ॥ त्यानें ॥
हाणि काळासी तो लाथा । काळ ठेवी तत्पदिं माथा ॥ काळ ॥
ऐसा संतांचा अधिकार । साई संतांचे सरकार ॥ साई ॥

---

१ प्रेताला. २ मंगल. ३ परमात्मा विष्णु. ४ शोभते. ५ अभिमानाची संगती. ६ दमेपर्यंत. मान ओंवाळणें किंवा वर्तुलाकार फिरवणें. ७ संतांच्या समाधीसच संतशरीर समजून. ८ अरे बाबा. ९ आश्चर्यवाचक. १० बाबांना. ११ भीते. १२ मृत्यूची.

करूं सरकारा मूजरे । आपण चरणाचे हूजरे ॥ आपण ॥
मलगे गुप्त मुक्ती ठेवा । अन्य भक्तांना तो द्यावा ॥ अन्य ॥
बाळ विनवी नित्य सेवा । देइ तवपद भक्ती सेवा ॥ देइ ॥

७० अभंग

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥
नलगे मुक्ती धन संपदा । संत संग देई सदा ॥
तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आम्हांसी ॥

७१ आरती श्रीसाईबाबांची

आरती साइबाबा । सौख्य दातार जीवा । चरण रजातळीं । निज दासां विसावा भक्तां विसांवा ॥ आ० ॥ जाळुनि अनंग स्वस्वरूपीं राहे दंग । मुमुक्षु जना दावी । निज डोळा श्रीरंगा ॥ डो० ॥ आ० ॥१॥ जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसी दयाघना । ऐसी तुझी ही माव ॥ तु० ॥ आ० ॥२॥ तुमचें नाम ध्यातां । हरे संसृति व्यथा । अगाध तव करणी । मार्ग दाविसि अनाथा ॥ दा० ॥ आ० ॥ ३ ॥ कलियुगीं अवतार । सगुण ब्रह्म साचार । अवतीर्ण झालासे । स्वामी दत्तदिगंबर ॥ द० ॥ आ० ॥ ४ ॥ आठां दिवसां गुरुवारी । भक्त करिती वारी । प्रभुपद पाहावया । भव भय निवारी ॥ भ० ॥ आ० ॥ ५ ॥ माझा निज द्रव्य ठेवा । तव चरणरज सेवा । मागणें हेंचि आतां । तुम्हा देवाधिदेवा ॥ ॥ आ० ॥ ६ ॥ इच्छित दीन चातक । निर्मल तोय निज-सूख । पाजावें माधवा । सांभाळ आपुली भाक ॥ आ० ॥ भा० ॥ आ० ॥ ७ ॥

251

७२ आरती श्रीज्ञानेश्वर महाराजांची

आरती ज्ञानराजा । महाकैवल्य तेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ॥ धृ० ॥
लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ॥ १ ॥
कनकाचें ताट करीं । उभ्या गोपिका नारी ।
नारद तुंबरहि । साम गायन करी ॥ २ ॥
प्रगट गुह्य बोले । विश्वब्रह्मचि केलें ।
रामा जनार्दनी । पायीं मस्तक ठेविलें ॥ ३ ॥

७३ आरती श्रीदत्तगुरूंची.

काषायांबर खंड सुनिर्मित कौपीनम् ।
दंडकमंडलु मंडन मंडित मूर्धानम् ।
रिपु मंडल मदखंडन पंडित विज्ञानम् ।
योग कला कलिताखिल त्वंपद महिमानम् ॥
जयदेव जयदेव जययति यूथपते । मामुद्धर
नरसिंह सरस्वति विमल मते ॥ जयदेव जयदेव ॥ १ ॥
पद्मासन विजयश्री सेवित पादाग्रम् ।
अर्धोन्मीलित नयन निरीक्षित नासाग्रम् ।
प्रणवांत प्रतिपाद्य स्वानुभवाकाग्र्यम् ॥
जगदुद्धामनि धामनि जगदीक्षा व्यग्रम् ।
जयदेव जयदेव ॥ २ ॥
हरिकीर्तन समयाधृत वैकुंठ निवासम् ।
पंचीकरण महावागुपदेश विलासम् ।

निजनैगम महिमामृतवंतं चिद्वासम् ।
वंदे रुक्म सुतार्चित पादुकमविनाशम् ॥
जयदेव जयजयदेव ॥ ३ ॥

७४ अभंग

घालीन लोटांगण । वंदीन चरण । डोळ्यांनि पाहिन रूप तुझें ॥
प्रेमें आलंगिन आनंदें पूजिन । भावें ओंवाळिन म्हणे नामा ॥

७५ उपजाति वृत्तम्

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ॥
करोमि यद्यत्सकलं परस्मै । नारायणा येति समर्पयामि ॥

७६ स्रग्विणी वृत्तम्

अच्युतं केशवं राम नारायणम् । कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिम् ॥
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभम् । जानकी नायकं रामचंद्रं भजेत् ॥

७७ अनुष्टुभ् वृत्तम्

हरे राम, हरे राम, राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ॥
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥

श्री सच्चिदानंद सद्गुरु दत्त महाराज की जय.
श्री सच्चिदानंद सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज की जय.

श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय.

श्री सच्चिदानंद सद्गुरु सर्व साधु संत महाराज की जय.

हीं वाक्‍सुमनांजलि श्रीसमर्थ सद्गुरु सच्चिदानंद बाबांचे पुण्य चरणीं नम्रता व अत्यादरपूर्वक नितांत प्रेमभावानें समर्पण असो.

ठाणें,<br>
भाद्रपद कृष्ण ५, बुधवार<br>
शके १८५२.<br>
ता. ३०-९-३१

संतदासानुदास,<br>
श्री बाबांच्या चरणरजाचा दासानुदास<br>
बाबांचा बाळ.

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर,मार्जिन सोडून,सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांना तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेख सोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**